हॅरोल्डच्या खोलीतील चित्र

क्रॉकेट जॉन्सन

मराठी: अश्विनी बर्वे




हॅरोल्डच्या खोलीतील चित्र


क्रॉकेट जॉन्सन

मराठी: अश्विनी बर्वे







“मला माझ्या भिंतीवर लावण्यासाठी
चित्र हवं आहे.” हॅरोल्ड म्हणाला.




त्याने त्याच्या जांभळ्या
खडूने एक घर काढले.




अधिक घरांनी मिळून एक छोटेसे
गाव तयार झाले. ते खूप दूर होते.



शहराच्या सभोवताली जंगल
आणि टेकड्या होत्या.




आणि ते एका लांब रस्त्याच्या
शेवटी होते.



“ते चंद्र प्रकाशात सुंदर दिसेल”
हेरॉल्ड म्हणाला.

आणि मग तो चंद्र
काढण्यासाठी चित्रात गेला.




त्याने खाली घरांकडे बघितले आणि म्हटले
“मी राक्षस आहे”

पण राक्षस गावातल्या सगळ्या
लोकांना घाबरवेल.




“हे चांगले आहे की कोणीही उठलेले
नाही आणि मला पाहिलेले नाही.“
हेरॉल्ड म्हणाला.



तो टेकड्यांवर गेला आणि “मी
किती मोठा झालो” तो म्हणाला.




हॅरोल्डचे डोके
ढगांच्या वर होते.




काही पावलांतच तो
जमिनीच्या शेवटाकडे आला.



आणि कोणत्याही जमिनीच्या
टोकाला पाणी असते.




तो समुद्र आहे," हॅरोल्ड म्हणाला.
"तिथे समुद्री पक्षी आहेत."




हॅरोल्ड खूप प्रचंड होता.
तो समुद्रात चालत गेला.




त्याच्या समोरून एक मोठे जहाज गेले.
ते एक महासागरी जहाज होते.




मग समुद्रांच्या लाटांबरोबर एक
मोठा व्हेल पाणी बाहेर सोडत आला.



आणि हॅरोल्डच्या अगदी पुढे एक
जुने शिडाचे जहाज होते.



हॅरोल्ड सहज समुद्राच्या
बाहेर पडला.




समुद्र संपल्यावर तिथे
टेकडी होती.




हॅरोल्डला काही खडक चढून
जावे लागले.




मग तो समुद्रातून बाहेर
येऊन टेकडीवर गेला.




मग त्याने पहिले की जहाज
खडकांच्या खूप जवळ आहे.




खलाशांना रस्ता कळावा
म्हणून त्याने दीपगृह काढले.




मग हॅरोल्ड उच्च टेकड्या
पण वर चढलो.




हॅरोल्ड सर्वांना उच्च पर्वत
पासून खूप अधिक उच्च होता.




आणि मग तो त्याच्या रस्त्याने
उंच पर्वतावर गेला.




हेरॉल्ड पर्वताच्या
पेक्षा उंच होता.




“मी सगळ्यांपेक्षा उंच आहे.”
तो म्हणाला..



मग त्याने लगेचच
विमानांचा विचार केला.






त्याचा अपघात झाला असता
पण हॅरोल्डने वेळीच आपले
डोके खाली वाकवले.

ते एक मोठे जेट विमान होते,
जे खूप वेगाने उडत होते.





त्याने डोंगरात एक खोलगट जागा शोधली.
रेल्वे जाण्यासाठी ती एक चांगली जागा होती.


ते एका लांब सपाट
मैदानावर आले.




हॅरोल्डने ट्रॅकच्या जवळ काही
पक्षी आणि फुले काढली.




“लोकांना ट्रेनमधून बघायला आवडेल”
तो म्हणाला.




हॅरोल्ड, रेल्वेमार्ग, फुले
आणि पक्षी काढत राहिला.



आणि त्याला सतत रेल्वेगाड्यांवर
लक्ष ठेवावे लागत होते.



एका लहान मुलासाठी ते
मोठे काम होते.



अचानक त्याला जाणवले की
तो किती लहान झाला आहे.




आता तो डेझी
फुलांच्या अर्धा होता!




तो पक्ष्यापेक्षाही लहान होता.
आता तो घरी कसा जाईल?






आणि, मग तो एका
उंदराच्या बिळात पडला.

"माफ करा," तो उंदराला म्हणाला..



एक-दोन मिनिटांनी
तो पुन्हा उभा राहिला.




मग हॅरोल्ड विचार करण्यासाठी
एका दगडावर बसला.




“हे तर फक्त एक चित्र आहे!” तो म्हणाला.

मग त्याने त्याचा खडू घेतला
आणि तो ते ओलांडून आला.






मी मोठा किंवा लहान नाही. मी
माझ्या नेहमीच्याच उंचीचा आहे!




पण त्याला त्याबद्दल खात्री
कशी असू शकणार होती?



घरी तो त्याच्या नेहमीच्याच
आकाराचा होता.



मगत्याने आपल्या
खोलीचे दार काढले.



दाराच्या मागच्या बाजूला एक लांब आरसा त्याने काढला.

"हो," तो म्हणाला."मी माझा मापाचा आहे."

tो त्याच्या खोलीत आल्यामुळे त्याला आनंद झाला.पण त्याच्या खोलीत लावायला कोणतेही चित्र त्याच्याजवळ नव्हते.



म्हणून त्याने झोपण्यापूर्वी एक चित्र काढले.

समाप्त